कृत्य नाहीं? त्यावर नाहीं असें सांगतात- 'हें सर्व उदाहरणजात' प्रमाणावांचून उदाहरणमात्रावरून अर्थाच्या सिद्धीच्या असंभव असल्यामुळें प्रत्युदाहरणाच्या संभव आहे असा भाव.

६८।१२ 'अस्मत्प्रत्ययविषयत्वात्' हें भाष्य आत्म्यांत अध्यासाच्या उपपत्ती करितां आहे. त्यांत अस्मत्प्रत्ययवस्तूच्या निमित्तानें अध्यास दाखविला. आतां विषय शब्दाच्या अर्थ सांगतात- 'म्हणून' पण गौणवृत्तीनें विषय शब्दाच्या प्रयोगांत कोणतें गुणसाम्य आहे? त्यावर सांगतात- 'कारण प्रमेयाला' पण सविकल्पक अध्यासाला सविकल्पक अधिष्ठान

॥ विवरणव्याख्यान ॥

नाहीं असें सांगतात- 'त्यावर सांगतात' त्यांना असंभावना निवर्तकत्व कशामुळें? अर्थ माध्यकावयकां असणार नाहीं? अशी आशंका असतां सांगतात 'प्रमाणावांचून' निरपेक्ष आगम प्रमाण शब्दाचा अर्थ आहे. असंभावनेच्या निरासार्थ जें उदाहरण ते प्रत्युदाहरण

'म्हणून अशारीतीनें' यानें विषयत्वाचे उपपादन केलें जातें तें कशामुळें? कारण त्याचें प्रकृताशी असंगति आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'अस्मत्प्रत्ययविषयत्वात् हें' अस्मत्प्रत्यय शब्दानें अहंकार अभिमत असून त्याच्या निमित्तानें कर्तृत्वादि अध्यास दाखविला असा अर्थ. आतां आत्म्यांत अनात्म्याच्या अध्यासाच्या उपपत्ती करितां विषय शब्दाचा अर्थ सांगतात- असा अन्वय. 'पण मग व्यवहारयोग्यत्व' येथें व्यवहारयोग्यतेनें आत्म्याच्या विषयत्वाची सिद्धि झाली असतां अध्यासाची सिद्धि व अध्यासाची सिद्धि असतां अध्यस्त अहंप्रत्ययावरून त्याच्या व्यवहारयोग्यतेची सिद्धि असें इतरेतराश्रयत्व सांगितलें तें संभवत नाहीं कारण निर्विकल्पक चैतन्यांत अज्ञानाच्या अध्यास दिसतो? अशी आशंका असतां सांगतो- 'पण सविकल्पक'

॥ व्याख्यान ॥

व्यवहारयोग्यत्वाच्या अव्यभिचार असतो. पण मग व्यवहारयोग्यत्व असतां अध्यास होणार व अध्यासानें परिनिष्पन्न अहंप्रत्ययावरून व्यवहारयोग्यत्व येणार असें इतरेतराश्रयत्व प्राप्त झालें? नाहीं कारण अनादित्वानें त्याचा निरास केला आहे.

॥ विवरण ॥

सांगितलें पाहिजे. कारण तसें दिसतें. निर्विकल्पक चिन्मात्र नव्हे. तेथें अहंकारादिकांच्या अध्यासानें सविकल्पक आत्म्यांत अहंकाराच्या अध्यास कसा? अशी शंका घेतां 'पण मग व्यवहारयोग्यत्व' निर्विकल्पांतही सविकल्पाच्या अध्यास दिसत असल्यामुळें. किंवा अज्ञानाच्या अध्यासानें सविकल्पांत, किंवा पूर्वीच्या अहंकाराध्यासानें सविकल्पक चिदवभासांत उत्तरोत्तर अहंकाराध्यास संभवतो असें सांगतात- 'नाहीं कारण'.

॥ विवरणव्याख्यान ॥

'सविकल्पकाला अध्यासाला'= परिच्छिन्नाच्या अध्यासाला. मग अहंकाराध्यासानें सविकल्पक [व्यवहारायोग्य] चैतन्यांत अहंकाराच्या अध्यास कसा? अशी आशंका असतां इतरेतराश्रयत्वामुळें तसें नाहीं असें सांगतो 'तेथें अहंकारादिकांच्या' पण व्यवहारयोग्यता व अध्यासाला आगन्तुकत्व असल्यामुळें "अनादित्वानें त्याचा निरास केला" असें जें म्हटलें तें असंगत आहे? अशी आशंका असतां प्रथम व्याख्यानाहून दुसरें समाधान सांगतात- 'निर्विकल्पांतही' कारण 'अपरिच्छिन्न गगनादिकांत सविकल्पक नीलकटाहाच्या अध्यास दिसतो असा अर्थ. सविकल्पकत्व असतांच अधिष्ठानत्व असतें असा अभिनिवेश असेल तर तोहि सुसंपाद आहे असें सांगतात- 'किंवा अज्ञानाच्या' अज्ञानाच्या अध्यासानें सविकल्पांत अहंकाराच्या अध्यास होतो व अज्ञानाच्याला अनादित्व असल्यामुळें इतरेतराश्रयत्व येत नाहीं. प्रकारान्तरानें इतरेतराश्रयत्वाच्या निरास करितात- 'किंवा पूर्वीच्या'

पण आत्म्याच्या अधिष्ठानतेच्या उपपादनानंतर भाष्याची व्याख्या सोडून प्रतिकर्म व्यवस्थेच्या उपपादनाच्या प्रसंग अत्यास दिसत नाहीं? अशी आशंका असतां सिद्धान्तीच्या मतांत प्रमातृत्वादि व्यवस्थेच्या असंभव असल्यामुळें विकारित्वादि

॥ विवरण ॥

४८।२०

पण अविकारी चैतन्यैकतान निष्कलंक स्वभाव आनंदस्वरूप असंग आत्म्याला प्रमातृत्व उपपन्न होत नाही. कारण त्याला प्रमिति क्रियापरिणामाचा अयोग आहे; व प्रमातृत्व नसल्याने कर्तृत्व भोक्तृत्व संभवत नाहीत. म्हणून प्रमातृ प्रमाण प्रमेय, कर्तृ कर्म कार्य, भोक्तृ भोग भोक्तव्य संसर्ग लक्षण व्यवहाराच्या आत्म्यांत असंभव असल्यामुळे व अहंकाराला अचेतन असल्याने त्या सामर्थ्याचा अयोग असल्यामुळे हें जगत ठारच अव्यवहार्य होईल असें म्हणाल तर आतां जर स्वभावसिद्ध चैतन्य प्रकाशानेच विषयाला प्रकाशित करील तर आत्म्याचे अविशेषामुळे व सर्वगतत्वामुळे ~~सर्वा~~ सर्वच प्रकाशित करील अशा रीतीने अव्यवस्थाच येते. म्हणून विकारसमर्थच आत्मा आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

आश्रयणीय आहे व त्यामुळे अध्यासाची अनुपपत्ति आहे? असा उत्तर ग्रंथाचा निष्कर्ष शंकेला सांगतात - 'पण' तुमच्या मतात काय आत्म्याला प्रमातृत्व आहे? किंवा अहंकाराला? पहिल्यांत काय प्रमेयत्व कर्तृत्व प्रमातृत्व आहे? किंवा अनित्य प्रकाशत्व? पहिला पक्ष नाही असे सांगतो - 'अविकारी' ~~स्व~~ स्वभावस्वरूपामुळेही साध्यत्व नाही असें सांगतो - 'चैतन्यैकतान' प्रयोजनाच्या अभावामुळेही परिणाम नाही तो असा - काय दुःखाचा परिहार फल आहे? किंवा सुखी निर्दुःख स्वभावामुळे पहिला पक्ष नाही असें सांगतो 'निष्कलंकस्वभाव' दुसऱ्या पक्षाचा निरास करितो 'आनंदस्वरूप' हेतूच्या संबंधाच्या अभावामुळेही परिणाम नाही असें सांगतो - 'असंग' अविकारी पदाने सूचित हेतु स्पष्ट करितो 'कारण त्याला प्रमिति' प्रमातृत्वाच्या अभाव असतां कर्तृत्वादिकाच्या असंभव असल्यामुळे प्रमातृत्व मानले पाहिजे? अशी आशंका असतां कर्तृत्वादिकाचा असंभवही इष्ट आहे अशी शंका असतां असें सांगतो - 'व प्रमातृत्व' मग ~~प्रमातृ~~ कर्तृत्वादिक नसोत? अशी आशंका असतां सांगतो - 'म्हणून प्रमातृ' अहंकाराला प्रमातृत्व आहे या पहिल्या विकल्पातील दुसऱ्या कल्पाचा निरास करितो - 'व अहंकाराला' आत्म्याला अपरिणामित्व असतांही स्वरूप चैतन्यवत्वामुळेच प्रमातृत्व आहे? अशी शंका घेतात - 'आतां जर' अतिप्रसंगाने दूषित करितात 'तर अविशेषामुळे' नित्याच्या अविशेष असतांही संबंधाच्या अभावामुळे सर्वांचे प्रकाशत्व नाही असेंही म्हणतां येणार नाही असें सांगतो 'व सर्वगतत्वामुळे' पूर्वपक्षाचा उपसंहार करितो - 'म्हणून विकार'

॥ विवरण ॥

४८।१

यावर दुसरा बोलतो - (द्वैती) सर्वगत आत्मवाद्यांच्या हा आक्षेप संभवत नाही. कसा? जर आत्मा, विषय इंद्रिय व मन या चतुष्टयाच्या सन्निकर्षादिकाने उत्पन्न होणारे ज्ञान, क्रिया किंवा गुण असो, निरवयवांत प्रदेशाश्रयत्वाच्या अनुपपत्तीमुळे संपूर्ण आत्मसमवायीच उत्पन्न होईल. तेव्हा सर्वगतत्वाला एकेकाळी सर्व मूर्त द्रव्यांच्या संयोग लक्षणामुळे विज्ञानाश्रय आत्मसंयुक्त सर्व वस्तूला भासविणारे विज्ञान होईल. कारण प्रदीपादिकांतील क्रिया व प्रकाश गुणांना स्वाश्रयसंयुक्त वस्तूंत अनुरूप प्रकाशादि अतिशय हेतुत्व आहे. पण अदृष्टाने क्वचित्च विषयांत ज्ञान नियमित केले जाते? असें असेल तर नाही.

॥ विवरणव्याख्यान ॥

पण कोणाच्याही मतांत व्यवहाराची उपपत्ति होत नाही? असा वैतंडिक आक्षेप घेतो - 'यावर दुसरा' काय प्रमातृत्वादि व्यवस्था संभवत नाही असा [द्वैती] सर्वगत आत्मवाद्यांच्या आक्षेप आहे? किंवा अणुपरिमाण आत्मवाद्यांचा? किंवा देहपरिमाण आत्मवाद्यांचा? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितो - 'सर्वगत' कारण त्यांच्या मतांतही व्यवस्थेची अनुपपत्ति समान आहे असा अर्थ. द्वैती मतांत आत्म्याला सर्वगतत्व असतांही विकारित्वामुळे स्वसमवेत ज्ञानानें प्रमातृत्व संभवते? अशी शंका घेतो 'कसा' काय ज्ञानाला क्रियात्व आहे? किंवा गुणत्व? दोन्ही पक्षी काय ते संपूर्ण आत्मसमवायी आहे? किंवा प्रदेश समवायी? असा विकल्प करून पहिल्याचा अनुवाद करितो - 'जर आत्मा' पक्षांतराचे निरसन करील ~~सांविरुद्धत्व~~ निरवयव अर्थात हेतु सांगतो - 'निरवयवांत' त्यामुळे काय? त्यावर सांगतो - 'तेव्हा' सर्वांच्या आत्मसंयुक्तत्वाविषयी हेतु सांगतो - 'सर्वगतत्वाला' पण क्रमाने सर्वांच्या संसर्गाच्या अभाव मतांतही संभव आहे? त्यावर सांगतो - 'एकेकाळी' मनाला स्वाश्रया [आत्म्या]शी संयुक्तत्व असतां विज्ञानाला सर्व भासविणारे कां म्हणावे नाही? त्यावर सांगतो - 'कारण प्रदीपादिकांतील' वगैरे अर्थ आहे: कारण प्रदीपातील प्रकाशगुणाला व वातातील क्रियेला स्वाश्रय संयुक्त वस्तूच्या प्रकाशन स्पंदन लक्षण अतिशय हेतुत्व आहे असा अर्थ. संबंधाच्या अविशेष असतांही अदृष्टामुळे नियम आहे? अशी शंका घेतो 'पण अदृष्टाने' आत्म्याहून अतिरिक्त पुरुषसंबंध असतां अदृष्टाच्या अभावाने कार्याचा अभाव दिसत नसल्याने असे नाही असें सांगतो - 'नाही कारण' संयुक्ताचे बोधकत्व

॥ विवरण ॥

कारण जिज्ञास्यांवस्तुशी संबंधित तेहीडे तिसऱ्या वस्तूचा भास विणाऱ्या प्रदीपादिकांत अदृष्टाने वस्तुसामर्थ्याचा अतिक्रमण करून कोणी नियमाङ्कित नाही. सुखदुःखादिकांचा निमित्त नसल्यामुळे तृणादि उपेक्षणीय सर्व विषयांच्या भासविण्याने ही अदृष्टनियमाची अनुपपत्ति आहे. पण जनकाकार्य ज्ञान प्रकाशास अविहित सर्वांचा नाही? असें असेल तर नाही. कारण चक्षुरादिकांत प्रकाशाचा प्रसंग येतो. व विषयाचा अनिरूप्य मानत्व असल्यामुळे 'विषयतेने जनक' अशा विशेषणाचा उपयोग आहे. प्रदीपादिकांतीलही प्रकाशगुणाचा [illegible] संयुक्त अजनक विषयांतेही प्रकाशकत्व दिसतें. विज्ञान क्रियारूप असतां [illegible] समान आहे, कारण बाणादिकांच्या व्यापारांना अनुद्दिष्ट ही विषयांत [illegible]-

॥ विवरणव्याख्यान ॥

'वस्तुसामर्थ्य' शब्दाचा अर्थ आहे. याही कारणामुळे अदृष्टाला नियामकत्व नाही असें सांगतो — 'सुखदुःखादि' इत्यादि आदि शब्दाचा अर्थ आहे. पुण्यापुण्यलक्षण अदृष्टाला सुखदुःखाचा साधन स्रक् चंदन कंटकादिकांचे नियामकत्व असेल तरी उपेक्षणीयांच्या ज्ञानाचे हेतुत्व त्याला अनुपपन्न आहे. म्हणून त्याचा नियम नाही. असा अर्थ. पण जें ज्याला जनक असेल तें त्याकडून प्रकाशित होते अशा नियमामुळे अतिप्रसंग नाही? अशी शंका घेतो — 'ज्ञानजनकत्वात्' तथापि अतिप्रसंगाचा निरास करणे? अशी शंका असतां सर्वांचा अजनकत्व असल्यामुळे असें सांगतो — 'सर्वोऽपि नाही' कार्य ज्ञानाचा जनकमात्राचा भासकत्व स्वभाव आहे? किंवा विषयतेने जनकाचा भासकत्व? असा विकल्प करून पहिल्याला अतिप्रसंगाने दूषित करितो — 'नास्ति कारण' दुसऱ्याला दूषित करितो — 'न विषयत्वात्?' अजनकाला ही विषयत्व दिसत असल्यामुळे जनकाचा भासकत्व असें [illegible] अशा नियमाची अनुपपत्ति आहे असें सांगतो — 'प्रदीपादिकांतीलही' ज्ञानाला गुणत्व आहे या पक्षांतील जनकाचा भासकत्वाचे निराकरण. क्रियापक्षांतही अतिदोष दाखवितो — 'विज्ञान क्रियारूप' ज्ञानाला उद्दिष्ट विषयांत अतिशयाधायकत्व असल्यामुळे सर्वांचा अनुद्दिष्टत्व असल्यामुळे सर्वांचे ग्रहण नाही? अशी आशंका असतां व्यभिचाराने दूषित करितो — 'कारणबाणादिकांच्या' आत्म्याचा सर्वांच्या संयोगाची अनुपपत्ति असल्यामुळे त्याच्या द्वारा समवेत ज्ञानाचा सर्वांचे भासकत्व नाही? अशी शंका.

॥ विवरण ॥

अशी संयोग असतां अतिशय हेतुत्व दिसतें. पण निरवयवत्वामुळे आत्म्याचा सर्वांशी संयोग होत नाही? मग किंचितही प्रकाशित होणार नाही. कारण क्रियावद्गुणाच्या आश्रयाला उल्लंघन करून अन्यत्र संसर्गाचा अयोग असल्यामुळे सर्वांशी असंसर्ग आहे. व असंसृष्टांत अतिशयाचा अयोग आहे. आतां शरीरावच्छिन्न आत्मप्रदेशांत समवायाने ज्ञान आहे संपूर्ण आत्म्यांत समवायाने नाही असें मत असेल तर मग आत्म्याचा सावयवत्व येतें. व व्यवहित विषयाचा अवभासही होणार नाही. कारण आत्माश्रयी प्रकाशाच्या विषयाशी असंसर्ग आहे. व क्रियादिकांचा आश्रयाचे उल्लंघन नसतें हें वर सांगितलें. आश्रय नसल्यामुळे आत्मप्रदेश संबंधामुळे तर अवभास होणार नाही. कारण सर्वांच्या आश्रयाला [illegible] प्र-

॥ विवरणव्याख्यान ॥

येथें — 'पण निरवयवत्वामुळे' अव्याप्य [-एकदेश] वृत्तिसंबंधाचा संयोगत्व असल्यामुळे व आत्म्याला निरवयवत्व असल्यामुळे संयोगाचा संभव नाही. असा अर्थ. मग अणुमात्र ही भासणार नाही कारण संयोगाच्या असंभवाचा अविशेष आहे. असें सांगतो — 'मग किंचितही' आत्म्याचा संयोगाचा असंभव असला तरी ज्ञानाला स्वसंसृष्ट विषयबोधकत्व आहे? अशी आशंका असतां सांगतो — 'कारण क्रियावद्गुणाच्या' संसर्गाचा अभाव असतां ही बोधकत्व होईल याचा निरास करितो — 'व असंसृष्टांत' कारण अतिप्रसंग येतो असा अर्थ. ज्ञानाला आत्म्याच्या एकदेशाशी समवायित्व असल्यामुळे सकलांचे भासकत्व नाही? अशी शंका घेतो — 'आतां शरीरावच्छिन्न' पण निरवयव आत्म्यांत प्रदेशांचा असंभव सांगितला अशी आशंका असतां औपाधिक प्रदेश सांगतो — 'शरीरावच्छिन्न' तो काय एकदेश सत्य आहे? किंवा असत्य? त्यांत पहिल्या कल्पाला दूषित करितो — 'मग आत्म्याला' दुसऱ्या पक्षीं प्रदेशाला कल्पितत्व असतां त्यांत समवेत ज्ञानालाही कल्पितत्व असल्यामुळे दृश्याच्या ज्ञानालाही असात्त्विकत्व येईल असा अर्थ. ज्ञानाला एकदेशाशी समवायित्व असतां दुसरें दूषण सांगतो — 'व व्यवहित' प्रकाशाच्या आश्रयाच्या द्वारा विषयाशी संबंध व्हावा पाहिजे. व आश्रयाचा तर व्यवहित विषयाशी संसर्ग नाही. असा अर्थ. पण दीपाचा विषयाशी असंसर्ग असतांही त्याच्या प्रभेचा जसें भासकत्व आहे तसें येथेंही ज्ञानाला आहे? अशी आशंका असतां प्रभेला द्रव्यत्व मानल्यामुळे त्यांचा संबंध येतो येथें ज्ञानाला द्रव्यत्व नाही अशा आशयाने सांगतो — 'वह्न्यादिकांचा'

॥ विवरण ॥

प्रसंग येतो: पण अभिचारकर्म स्वाश्रय आत्मप्रदेशाशी असंयुक्त पुरुषान्तरांत अनर्थाला उत्पन्न करिते त्याप्रमाणे येथेही अवभास होईल? अंतर नाही कारण येथ क्रियासामर्थ्य ~~[illegible]~~ अदृष्टांतही दोन्हीही आत्मप्रदेशाशी जात संयुक्त देवतात्मा ईश्वर किंवा दुसऱ्या हेतूचे अनुमान केले; पुरुषाश्रय ज्ञानापासून आत्मसंयुक्त मनाशी संसृष्ट अशा इन्द्रियाशी संयुक्त विषयांत तर अतिशय उत्पन्न होत नाही कारण मग विषय संयुक्त ही दुसऱ्या वस्तूंत 'पुकाशातो' अशा व्यवहाराच्या अतिशयाचा प्रसंग येतो. तसें संयोग प्रवाहाला (ज्ञानाच्या) पूर्वी अस्तित्व असल्यामुळे ज्ञानवानाशी विषयाच्या वर्तमान संयोग प्रवाहाचा अभाव आहे; याप्रमाणे अणु किंवा देहपरिमाण आत्मवादांतही

॥ विवरणव्याख्यान ॥

पण आश्रय अशा आत्म्याच्या एकदेशाच्या विषयाशी असंसर्ग असला तरी इतर प्रदेशाच्या विषयाशी संबंध असल्यामुळे त्याचे ज्ञान युक्त आहे? अशी आशंका असता सांगतो - 'आश्रय न संबद्ध' आश्रय आत्म्याचा विषयाशी असंबद्ध प्रदेशाशी उत्पन्न ज्ञान विषयांत अतिशय देईल की? अशी शंका घेतो - 'पण अभिचार' दृष्टान्ताच्या असाम्याने उत्तर सांगतो - 'येतसार नाही' वगैरे क्रियेला आश्रयाशी संयुक्तांत अतिशयाधायकत्व दिसते; तसें अभिचार करणाऱ्या आत्म्याशी व उद्दिष्ट पुरुष आत्म्याशी संयुक्त देवतात्म्याला अनर्थाधायकत्व ~~[illegible]~~ वाटेल जात असा अर्थ. किंवा अभिचार क्रियेनी समवायस्थित परमेश्वर अन्यत्र अनर्थास हेतु आहे असें सांगतो - 'ईश्वर' किंवा अभिचार कर्म कोणता कृत्य उत्पन्न करील. व ते अनर्थ उत्पन्न करिते असें सांगतो - 'किंवा दुसऱ्या' पण चतुष्टय संनिकर्षज ज्ञानाला इंद्रिय संयुक्तांत अतिशयाधायकत्व असल्यामुळे अतिप्रसंग येत नाही? अशी आशंका असतां सांगतो - 'पुरुषाश्रय' आत्म्याशी साक्षात् संबंधाचा अभाव असतांही परंपरा संबंधाच्या आश्रय करून विषयाच्या ज्ञानाचे उत्पादन असतां अतिप्रसंग येतो असें सांगतो 'कारण मग?' ज्ञानोत्पत्तीच्या नंतर चतुष्टय संनिकर्षाच्या सत्तेच्या कालप्रकाशाचा अभाव असल्यामुळे उत्पन्न झालेल्या ज्ञानाचाही ज्ञानाचा विषयाचे त्या विषयाशी संबंधाचा अभाव असल्यामुळे ~~चतुष्टय संनिकर्षज विषयाच्या ज्ञानाला~~ साधकत्व नाही असे सांगतो - 'तसें संयोग प्रवाहाला' (ज्ञानाच्या) सर्वगत आत्मवादांत विषयाच्या प्रकाशाची अव्यवस्था सांगून मतांतरांतही अव्यवस्था सांगतो 'याप्र-

॥ व्याख्यान ॥

तेथें अशा प्रकारच्या अहंकर्त्याच्या इदमंशाच्या ज्ञानरूप दिसे व्यापारविशेष सकर्मक असल्यामुळे स्वाश्रयांत कर्मकारकाभिमुख कांही अवस्थाविशेष ठेवतो. कारण क्रियेला स्वाश्रयांत विकारहेतुत्व आहे. तो

॥ विवरण ॥

मुख्य होय आहे; म्हणून सर्ववाद्यांच्या मतांत प्रमाणादि व्यवहाराचा संभव नाही.—

७०१७

~~ठरे~~ आमच्या मतांत तर कोणत्याही रीतीने संभव आहे असें सांगतात - 'तेथें अशा प्रकारच्या' 'इदमंशाच्या अंतःकरणाच्या, 'व्यापार' याने परिणाम सांगितला जातो (तो असा—) प्रकाशस्वभाव सावयव अंतःकरण अग्रभागाने इन्द्रियद्वाराने सरळ घटादि विषयापर्यंत दीर्घ प्रभेच्या आकाराने परिणामाला प्राप्त होते. कारण तेजाचे शीघ्र असें दूरगमन दिसते. त्या परिणाम द्वाराने कर्त्याचा कर्माशी संबंध अवस्थाविशेष आहे असें सांगतात —

॥ विवरणव्याख्यान ॥

'अणु' आत्म्याला अणुत्व असतां तत्समवेत ज्ञानापासून विषय अणुमात्र असेल. व देहपरिमाणत्व असतां दूरवर्ती वस्तूच्या संनिकर्षाच्या अभाव असल्यामुळे व्यवहित विषयाच्या भासाचा संभव नाही असा अर्थ. वैतण्डिक आपल्या मताच्या उपसंहार करितो — 'म्हणून सर्व'

ह्या मतांत व्यवहाराच्या असंभवाच्या असंभवाचा अंगीकार करितात 'इतरे' पण अद्वैतमतांतही व्यवहाराचा असंभव सांगितल्याची अशी आशंका असतां काय परमार्थतः असंभव आहे? किंवा कल्पितत्वानेही? असा विकल्प करून पहिल्याचा अंगीकार करून दुसऱ्याला दूषित करितात - 'आमच्या मतांत' 'कोणत्याही रीतीनें' = कल्पितत्वानें. इदमंश शब्दानें बाह्याचा आणि मन इदमंशाग्रहण केलें जाते? अशी आशंका असतां सांगतात - 'इदमंशाच्या' अंतःकरणाच्या 'व्यापार' शब्द परिस्पंद परिणामांत साधारण असल्यामुळे त्याचा विवक्षित अर्थ सांगतात - 'व्यापार याने' पण अंतःकरणाच्या क्षणमात्राने, व्यवहित असा घटादि आकाराने परिणाम कसा? इत्यादि अशी आशंका असतां सांगतात - 'प्रकाशस्वभाव' अंतःकरण घटादि पर्यंत अतिदीर्घ प्रभेच्या आकाराने परिणामाला प्राप्त होते. असा बोध. त्याविषयी हेतु सांगतात 'कारण तेजाचे' दृष्टान्त आदित्य [सूर्य] दिशांत सहस्रांशूच्या उदयमात्राने त्याच्या किरणांची

॥ व्याख्यान ॥

तर प्राप्त होतो या क्रियेनी ठेवलेल्या कर्त्यातील विशेषाप्रमाणे कर्माशी संबंध झाल्याच्या

॥ विवरण ॥

'तोतर प्राप्तहोतो' 'तेथें अशाप्रकारच्या' इत्यादिकांचा पदशः हा अर्थ — 'तेथें' = आत्म्याला अकर्मस्थत्वय-विषयत्व असतां 'अशाप्रकारच्या' = चैतन्यरूप अशा. 'अहंकार त्याच्या' = अहंकाराशी ऐक्याध्यासाला प्राप्त झालेल्या आत्म्याच्या. 'इदमंशाचा ज्ञान शब्दांत व्यपदेशविशेष' — सत्त्वप्रधान अंतःकरणाच्या ज्ञान शब्दानें बोलला जाणारा परिणामविशेष. त्याचे प्रयोजन सांगतात — 'सकर्मकत्वामुळें' इत्यादि. दुःखादि सुखादि अवस्थेहून त्याचा विशेष सांगतात — 'कर्मकारकाधिपुरुष' कर्मकारकाधिपुरुषत्वविषयीं हेतू सांगतात 'कारण क्रियेला' स्वाश्रयांत फलाकरितां तो हेतु असल्यामुळे. अशा अर्थी. गति क्रियेला कर्त्यांत ग्रामप्राप्तिरूप अतिशयजनकत्व दिसतें त्याप्रमाणे ज्ञानालाही क्रियात्व असल्यामुळें स्वाश्रयांतच अतिशयजनकत्व येईल? अशी आशंका असतां सांगतात — 'तोतर' प्राप्त होतो या क्रियेनी ठेवलेल्या कर्त्याशी समवेत असेल त्या ग्रामसंबंधाला जसें ग्रामव्यापित्व आहे. तसें ज्ञानालाही सकर्मकत्व असल्यामुळे त्यानी ठेवलेला संबंध ज्ञातृ इयत्ता लक्षण आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

मंदिरापर्यंत व्याप्ति दिसते. असा अर्थ. तेजाचे अति दूरगमन असतांही अंतःकरणाला काय प्राप्त होते? त्यावर सांगतात — 'प्रकाशस्वभाव — (अंतःकरण)' पण प्रकाशस्वभाव असतांही आत्म्याच्या परिणाम दिसत नाही? त्यावर सांगतात — 'सावयव (अंतःकरण)' कदाचित् किंचित् विषयांत अंतःकरणाच्या परिणामाला कोणता हेतु? त्यावर सांगतात — 'अदृष्ट' प्रकाश आदि शब्दांचा अर्थ आहे. प्रतिपादनाचे फल सांगतात — 'त्यापरिणामद्वारानें' परिणाम असतें जो अवस्थाविशेष तो कर्त्याच्या कर्माशी संबंध. असा संबंध. किंवा कोणता तो अवस्थाविशेष? अशी आशंका असतां सांगतात — 'त्यापरिणामद्वारानें.' 'तेथें अशाप्रकारच्या' येथून 'ज्ञातृ इयत्ता लक्षण आहे' येथपर्यंतच्या ग्रंथाचा अर्थ स्पष्ट आहे. पण आत्म्याला विषयविशेषाशी संबंधाच्या अभावामुळे त्याचे ज्ञान कसें? अशी शंका येते —

॥ व्याख्यान ॥

शेषाशी संबंध झाल्याजातो. त्याने विषयविशेषाशी संबद्ध अंतःकरण आत्मचैतन्याचे अवच्छेदक होते. कर्मकारकही — प्रधान क्रियेच्या सिद्धींत स्वव्यापारांत प्रविष्ट झालेले चैतन्यावर.

॥ विवरण ॥

७०।८

— असा. पण अंतःकरणाच्या स्वपरिणामद्वारानें विषयविशेषाशी संबंध असो. आत्म्याला तर विषयविशेषाच्या अवभासकत्व? त्यावर सांगतात — 'त्याने विषयविशेषाशी' ज्या अर्थी अंतःकरणाचा विषयविशेषाशी संबंध आहे त्या अर्थी विषयविशेषाशी संबद्ध अंतःकरण चैतन्याचे अवच्छेदक होते = आत्म्याला स्वगत विषयविशेषाच्या संबंधाला प्राप्त करितें. असा अर्थ. सर्वत्र अविद्येनें आवृत होऊन अनभिव्यक्त स्वभावही चैतन्य अंतःकरण ज्याज्या अवस्थाविशेषानें विवर्ताला (= परिणामाला) प्राप्त होतें त्यात्या आकारानें प्रगट होतें. जसें चतुष्कोणादि अवस्थाविशेषाला प्राप्त होणाऱ्या लोहपिंडानें अग्नि. अशा रीतीनें विषयाशी संसृष्ट अंतःकरणानें अवच्छिन्न चैतन्य त्याच्या आकाराचें भासतें असा भाव. पण प्रमातृरूपानें अवच्छिन्न चैतन्य विषयस्वरूपानें भासो. विषयाधिष्ठान चैतन्याचा विषयाशी अवच्छेदक? त्यावर सांगतात — 'कर्मकारकही' असा-

७०।१२

॥ विवरणव्याख्यान ॥

'पण अंतःकरणाच्या' आत्म्याचे द्वैपाव परिणामद्वारानें विषयाशी संबंध होतो असें सांगतात — 'त्यावर सांगतात' पण आत्म्याच्या विषयाशी संबंधाच्या संभव असतांही अनभिव्यक्तत्वामुळे (= विषयाला) त्याला व्यवहार हेतुत्व कसें? त्यावर सांगतात — 'सर्वत्र' अथवा सर्वगतत्वानें स्वतःच चैतन्याचा विषयाशी संबंधाचा संभव असल्यामुळे परिणामाचा काय उपयोग? अशी आशंका असतां सांगतात 'सर्वत्र' सर्वविषयामध्येंही अविद्येनें आवृत होऊन अनभिव्यक्तस्वभावही चैतन्य त्यात्या आकारानें प्रगट होतें असा अन्वय. कोणत्या आकारानें? अशी विवक्षा असतां सांगतात 'अंतःकरण' 'अवस्थाविशेषानें' = परिणामविशेषानें ~~त्याच्या~~ त्याच्या आकारानें = ~~विषयाच्या~~ प्रमात्याच्या आकारानें. नन्दी: २२५।७५ (आत्म) चैतन्याला अंतःकरणांत अभिव्यक्त होऊन बहुकारत्व असलें तरी (विषयाधिष्ठान चैतन्याला) असत्स्वच्छ विषयांत अनभिव्यक्त होऊन तदाकारतेचा अभाव असल्यामुळे घटादिकांचे साधकत्व कसें? अशी शंका येते — 'पण प्रमातृरूपानें' 'अवच्छेदक' प्रयोग. अंतःकरणाप्रमाणे त्यानें संबंधामुळें विषयालाही चैतन्याच्या व्यंजकत्वामुळे विशेष नाही असें सांगतात — 'त्यावर सांगतात?' 'कर्मकारकही अपरोक्षत्वाला प्रगट करितें असा अन्वय' येथून —

॥ व्याख्यान ॥

विवर्तत्वामुळे प्रधानक्रियेनें ठेवलेल्या प्रमात्याच्या अवस्था विशेषानें अवच्छिन्न अपरोक्षतेशी

तत्व-दी· पृष्ठ १२१

॥ विवरण ॥

कर्मकारकही अपरोक्षतेला प्रगट अभिव्यक्त करिते· असा अन्वय. विषयांत अपरोक्षतेचा सद्भाव असतां त्याची अभिव्यक्ति होईल परंतु ती न्य कोठून? त्यावर सांगतात– 'चैतन्यावर विवर्तत्वामुळे' विषयाला चैतन्यावर विवर्तत्व असल्यामुळे तेथेंही ती अ-सते असा अर्थ· तिच्या प्रगट करण्याविषयीं हेतु सांगतात– 'स्वव्यापारांत प्रविष्ट झालेले' स्वव्यापारांत प्रविष्टाच्या आगंतुकत्वा-विषयीं हेतु सांगतात– 'प्रधानक्रियेनें' प्रधानक्रिया = वृत्ति· 'स्वव्यापारांत प्रविष्ट झालेले' याने परिणामाच्या संसर्गामुळे चैतन्याभिव्यंजकत्वरूप जाड्याभिभवलक्षण योग्यत्वाला प्राप्त झालेले असें सांगितलें जातें· अंतःकरण तर जशी स्वतः तशी स्वसंसर्गीतही चैतन्याभि-व्यक्ति योग्यता प्राप्त करिते असा भाव· पण अवच्छेदकांच्या भेद असतां चित्प्रकाशाच्या भेदामुळे विषयावच्छिन्न अनुभवाच्या प्रमातृरूप अवभासाशी संसर्ग कसा? व असंसर्ग असतां 'मी हें जाणतो' असे प्रमातृ व प्रमेयांच्या संसर्गाला भासविणारे संवेदन कसें? कारण अनुभवांत भेद आहे. न एका संबंधावबोधांत दोन पदार्थांच्या अवभासाचा प्रयोग आहे? त्यावर सांगतात 'प्रधान क्रियेनें'

॥ विवरण व्याख्यान ॥

'प्रधानक्रिया = वृत्ति' येथ वर्तत्या ग्रंथ स्वरूपाचा आहे. 'स्वव्यापारांत प्रविष्ट झालेले' येथें कर्मकारकाला चैतन्याचें व्यंजकत्व सांगितलें ते अप्रकाश स्वभावामुळे असंभवनीय आहे. त्याच्या व्यापारही कसा प्रकाशमान होऊ शकतो? अशी आशंका असतां सांगतात– 'स्वव्यापारांत प्रविष्ट झालेले यानें'? अंतःकरणाचा चिद्व्यंजक स्वभाव असला तरी विषयाला ते कसें? त्यावर सांगतात– 'अंतःकरण तर' ज्याप्रमाणे प्रदीप स्वतः तम अंधःकाराच्या संसर्गाशी निरोधी असलेला स्वसंसर्गी विषयांतही अंधःकाराच्या संसर्गाला रोधितो. त्याप्रमाणें अंतःकरणाही· असा अर्थ· अंतःकरण व विषय यांना चैतन्याचें व्यंजकत्व सांगितलें त्यावर आक्षेप घेतो· 'पण अवच्छेदकां-च्या' अंतःकरण व त्याच्या वृत्तीचा विषय असा 'अवच्छेदकांचा भेद' असा अर्थ. अवयवांच्या भेदानें त्यांच्यातील प्रतिबिंबा-च्या भेदामुळे जसा त्यांच्या परस्पर असंसर्ग असतो त्याप्रमाणे व्यंजकांच्या भेदामुळे व्यंग्याचाही भेद आहे म्हणून परस्परांचा संसर्ग नाही· असा अर्थ· संसर्गाच्या अभाव असतां काय दोष? त्यावर सांगतो– 'व असंसर्ग' त्याविषयीं हेतु सांगतो – 'कारण अनुभवांत'

॥ व्याख्यान ॥

एकरूप अपरोक्षतेला प्रगट करिते· व त्यामुळे आत्म्याच्या अंतःकरणाच्या अवस्थाविशेष उपाधीनें उत्पन्न झालेला विशेष प्रमाता असून विषयानुभव शब्दित विषयातील अपरोक्ष करस फळ आहे· अशी

॥ विवरण ॥

ठेवलेल्या प्रमातृत्वाच्या अवस्थाविशेषानें अवच्छिन्न अपरोक्षतेशी 'एकरूप – अपरोक्षतेला' 'एकरूप = एक असणारी'– परिणाम विशेष ~~विषय निरोधाशी संबंध~~ 'अवस्था विशेष' शब्दाचा अर्थ आहे 'अवच्छिन्न = अभिव्यक्त'. परिणामाच्या उभयाशी संसर्गामुळे व्य-ञ्जकांच्या अभेदानें व्यंग्यातही अभेद आहे असा भाव· पण दोन्ही ठिकाणी चैतन्याची अभिव्यक्ति अविशेष असतां घटावच्छिन्न अनुभव प्रमाता आहे? किंवा अंतःकरणावच्छिन्न? असा विशेष वाटणार नाही? त्यावर नाही असें सांगतात– 'व त्यामुळे' कर्त्याला तर प्रमातृ-ता असते कर्माला नाही· तेथें अंतःकरणाला कर्तृत्व असल्यामुळे त्यानें अवच्छिन्न प्रमाता आहे असा अर्थ· पण चैतन्याला एकत्व असतां प्रमाताच फळ आहे· असें विरुद्ध प्राप्त झाले? त्यावर सांगतात– 'विषयानुभव शब्दित' अंतःकरणावच्छिन्नतेनें

॥ विवरण व्याख्यान ॥

'पण दोन्ही ठिकाणी भेद आहे' असा अर्थ· 'संबंधावबोधांत' = 'मी हे जाणतो' या ज्ञानात 'दोन पदार्थांच्या' – प्रमातृ व प्रमेयांच्या· अनुभ-वाचा भेद असिद्ध आहे असें सांगतात– 'त्यावर सांगतात' पण अवच्छेदकांच्या भेदामुळे अनुभवभेद सांगितला? अशी शंका असतां सांगतात– 'परिणामाच्या' 'अवच्छिन्न = अभिव्यक्त' व्यंजकांचा भेद असतां व्यंग्याचा भेद होईल· परंतु तसें येथें नाही कारण एका परिणामाला प्रमातृ प्रमे-यांच्या संसृष्टतेनें व्यंजकत्व आहे असा अर्थ· विषयविशेषांत चैतन्याची अभिव्यक्ति भिन्न असतां त्याला ही प्रमातृता येईल म्हणून अ-भिव्यक्ति नाही? अशी शंका घेतो– 'पण दोन्ही ठिकाणी' विशेषाभाव असिद्ध आहे असें सांगतात– 'त्यावर नाही' अपेक्षित हेतु सांगतात– 'कर्त्याला तर' पण प्रमातात फळांत सांकर्य प्राप्त होत असल्यामुळे चैतन्याची एकतेनें अभिव्यक्ति नाही? अशी शंका घेतो 'पण चैतन्या-ला' कर्ता व फळाचा भेद लोकांत प्रसिद्ध असल्यामुळे त्याच्या विरुद्ध कल्पना कशी करता येते असा अर्थ· उपाधिभेदामुळे सांकर्य नाही असें सांगतात– 'त्यावर सांगतात' उपाधिभेद स्पष्ट दाखवितात– 'अंतःकरणावच्छिन्नतेनें'

बोधकरस आत्म्याला अजन्यत्व असल्यामुळे फलत्व कसें? अशी आशंका असतां– 'विषयानुभव शब्दित विषयातील'

॥ व्याख्यान ॥

फळाला क्रियेशी एकविषयता युक्त होते. अशारीतीनेच अहंकृती स्वांशचैतन्यबळानें व्याप्त.

॥ विवरण ॥

प्रमाता असून विषयावच्छिन्न तेनें फळ आहे असा भाव. 'अपरोक्षैकरस' येथें 'आत्मा' असा शेष. 'विषमातीळ' = वृत्तिसंसृष्ट विषयातीळ. पण अंतःकरण व आत्म्याशी समवायी अशा क्रिया व फळांना भिन्नाश्रयत्व असून घट व अंतःकरण विषयतेनें भिन्नविषयत्व आहे? अशारीतीने क्रिया व फळाला एकाश्रयत्व व एकविषयत्व असणे या नियमाशी विरोध येतो! यावर नाही असें सांगतात- 'अशी फळाला क्रियेशी' विषयता हें आश्रयत्वाचेंहि उपलक्षण आहे. अंतःकरण व आत्म्याला ऐक्याध्यासाने एक (क्रियाफळांचें) ~~[illegible]~~ आश्रयत्व असून (~~[illegible]~~) चैतन्याचाही घटाच्या अवच्छेदामुळे (क्रियेशी) एकविषयता आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

–तें विषयातीळ' या

असें म्हटलें त्याचा अर्थ स्पष्ट करितात- 'वृत्तिसंसृष्ट' वृत्तिसंसृष्ट विषयांत अभिव्यक्त चैतन्याला [लक्षणच जन्य चैतन्याला] विषयाश्रयत्व आहे व त्यामुळे फळत्व व्यपदेश उचित आहे. असा अर्थ. पण असें असता क्रिया व फळाला समान आश्रय विषयत्व असणे या प्रसिद्धीला विरोध येतो? अशी शंका घेता 'पण अंतःकरण' क्रियेला अंतःकरण परिणामत्वामुळे त्याच्याशी समवायित्व असून फळाला तत्र चैतन्य प्रतिबिंबत्वामुळे बिंबभूत आत्मसमवायित्व आहे. अशारीतीने भिन्नाश्रयत्व आहे तसें त्यांना भिन्नविषयत्वही आहे. क्रियेला घटविषयत्व असून चैतन्याला अंतःकरणांत प्रतिबिंबित तेनें त्याचें साधकत्व आहे. पण वृत्तीशी संसृष्ट विषयांत व्यक्त झालेलें (~~लिंग (क्रियेला)~~ विषयक) चैतन्य वृत्तीचा विषय आहे? अशीही शंका घेतां येणार नाही. कारण चिदाभास वृत्तीला चैतन्यविषयत्व आहे. असा भाव. ~~हे व्यवहार~~ ~~नाही कारण [illegible] [प्रकटत्वाचा] [illegible] अंतःकरणाद्वारा घट आहे असें सांगतात. अशारीती~~ पण समानाश्रय विषयत्व प्रसिद्धीच्या विरोधाची शंका असतां समानविषयत्वच समाधानांत सांगितलें तें कां म्हणून? अशी आशंका असतां सांगतात 'विषयता'. पण आश्रयविषयांच्या भेद सांगितल्या असल्यामुळे फळाचा क्रियेशी समानाश्रयविषयत्व कसें? त्यावर सांगतात- 'अंतःकरण'. ऐक्याध्यासामुळे आत्म्याचा क्रियेचें आश्रयत्व असून अंतःकरणाचाही आत्म्याशी ऐक्यारोपा-

॥ व्याख्यान ॥

संतप्रविष्टतेनें प्रमाता आहे म्हणून 'बुद्धिस्थमर्थं पुरुषश्चेतयते' [= बुद्धिस्थ अर्थाला पुरुष

॥ विवरण ॥

पण 'बुद्धिस्थ अर्थाला पुरुष चेतवितो' असें सांख्य म्हणतात. त्याच्या विरुद्ध आत्मा सर्व ~~[illegible]~~ चैतन्याशी उपरक्त (अर्थाला) चेतवितो हें आहे? त्यावर सांगतात- 'अशारीतीनेंच' प्रथम बुद्धिस्थ अर्थाला (~~चैतन्याशी [illegible]~~) तिच्या आश्रयतेला प्राप्त झालेला भाग घेऊन चेतवितो असा अर्थ.

इतर सांगितलें कीं — सर्वगत ~~[illegible]~~ अविद्येनी आवृत प्रकाश ~~ही~~ आत्म्याला परिच्छिन्न अंतःकरण परिणाम या उपाधींत ७१।१० अभिव्यक्तीच्या अपेक्षेनें विषयविशेषाप्रत प्रमातृत्व आहे. पण ही अभिव्यक्ति कोणती? आवरणाचा अभिभवच होय.

॥ विवरणव्याख्यान ॥

मुळें अनुभवाश्रयत्व आहे. अशारीतीनें क्रियाफळाला समानाश्रयत्व असून अंतःकरण वस्त्याच्या वृत्तीला साधक चैतन्याला वृत्तिद्वारा घटसाधकत्वानें क्रियेशी एकविषयत्व आहे. असा अर्थ. कर्मकारकांत अभिव्यक्त चैतन्याला त्याचें साधकत्व असतां सांख्य वचनाच्या विरोध येतो? अशी शंका घेता- 'यत्बुद्धिस्थ' विरोधाच्या निरासाच्या प्रकार सांगतात- 'प्रथम' वृत्तिद्वारा बुद्धींत अर्थ प्रतिबिंबित होतो. मागाहून बुद्धीशी ऐक्याध्यासाला प्राप्त झालेला आत्मा वृत्तिसंसृष्ट विषय चैतन्याशी अभेदानें अभिव्यक्त झालेला अर्थाला चेतवितो. असा अविरोध आहे.

पण आत्म्याची अभिव्यक्ति मानली असतां अविद्येच्या निवृत्तीमुळे संसाराचा उच्छेद होईल व विषयविशेषाची प्रमातृता असणार नाही व आत्म्याची अनभिव्यक्ति असतां विषयाची अभिव्यक्ति होणार नाही? अशी आशंका असतां सांगतात- 'इतर' सर्वगत व अविद्येनी आवृत प्रकाश ही आत्म्याला अंतःकरण परिणाम या उपाधींत अभिव्यक्तीच्या अपेक्षेनें विषयविशेषाप्रत ~~[illegible]~~ प्रमातृत्व आहे. असा अन्वय. अविद्येच्या निवृत्तीनें संसाराचा उच्छेद होतो असेंही म्हणता येणार नाही. कारण बुद्धीच्या पूर्ण आत्माकार परिणामाला अविद्यानिवर्तकत्व असल्यामुळे व घटाकार परिणामाला परिच्छिन्नत्व असल्यामुळे त्याचें निवर्तकत्व नाही व तेथेंच अभिव्यक्ति त्यामुळें त्याचें प्रमातृत्व आहे. अशा आशयानें सांगतात 'परिच्छिन्न'. आत्म्याला स्वप्रकाशत्व असल्यामुळे त्याची मागांपुढं

॥ व्याख्यान ॥

चेतविसी) असें म्हटलें जातें. तेथें तर स्वयंज्योतिष प्रमात्याला विषयसंबंधानें उत्पन्न झालेला विशेषानुभव अपेक्षित नसतेनें (सर्वविषयां) सर्वांप्रत अविशिष्ट असतांही कारकांनामिळून प्रधान क्रियेचे साधकत्व असल्यामुळे

॥ विवरण ॥

स्वरूपाच्या अतिशय नव्हे. पण सांगितलेल्या उपाधीला काय प्रमाण आहे? 'कामो धीरित्येतत्सर्वं मन एव' [बृ. उ. १।५।३] धीशब्दवाच्य ज्ञानपरिणामवान् मन तेंच विज्ञान, बुद्धि आहे. असें सांगितलें.

म्हणून अशारीतीनें उपाधिवशात् नियम असतांही त्याच्या अज्ञानामुळे जी शंका घेतली जाते कीं — चैतन्याच्या सर्व विषयाशी अविशेषत्वामुळे सर्वांना ते कां भासत नाही? त्याचा परिहार करितात- 'तथेंतर' परिणामाशी संसृष्ट कर्मोपाधि नियमामुळे असंसृष्टांत चैतन्याची अभिव्यक्ति नाही म्हणून एका प्रमात्याला सर्व विषयांचा अवभास नाही. असा भाव. पण कर्मकारकांतही चैतन्य अभिव्यक्त होतें तर सर्व प्रमात्यांच्या साधारणतेनें तें सर्वांना भासो? त्यावर नाही असें सांग-

॥ विवरणव्याख्यान ॥

अभिव्यक्ति कशी? अशी शंका घेतात- 'पण नाही'. विषयस्थ चैतन्याचें आवरणानें अभिभूतत्वामुळे अभिव्यक्ति युक्त आहे असें सांगतात- 'आवरणाच्या' अभिभवशब्दानें प्रतिबंध विवक्षित आहे. किंवा विषयावच्छिन्न आत्म्याच्या अज्ञानाची निवृत्ति अभिभव होय. प्रत्येकाला लक्षित होणाऱ्या उपाधिविषयीं प्रमाण विचारितात- 'पण सांगितलेल्या' श्रुति प्रमाण आहे असें सांगतात- 'कामो धी' इ. पण तेथें लज्जादि धर्मक मन सांगितलें ज्ञानपरिणामवान् अंतःकरण नाही? त्यावर सांगतात- 'धीशब्दवाच्य' बुद्धि व मनांत एकत्व असल्यामुळे परिणामवत्त्वानें बुद्धि सिद्ध होते असा अर्थ.

'तेथें तर' या ग्रंथानें निराकृत शंका दाखवितात- 'अशारीतीनें' ज्या कर्मकारकाचा प्रधान क्रिया साधनत्व असते तन्निष्ठच अनुभव असतो असें कसें सिद्ध होतें? कारण सर्व विषयांनाही लिप्त सन्निधानानें चैतन्यव्यंजकत्व अविशेष आहे? त्यावर सांगतात- 'परिणामाशी संसृष्ट' परिणामाशी संसृष्ट जो कर्मकारकलक्षण उपाधि तेथेंच चैतन्याच्या अभिव्यक्तीचा नियम असल्यामुळे अतिप्रसंग नाहीं असा भाव.

प्रकारान्तरानें अनियमाची शंका घेतात- 'पण कर्मकारकांतही' इत्यादि. सौरालोकाच्या सर्वसाधारणत्वाप्रमाणें घटांत अभिव्यक्त

॥ व्याख्यान ॥

ज्याच्याशी (ज्याविषयाशी) सह साधन असते तन्निष्ठच असतो, अन्यत्र नसतो. कर्मकारकही ज्याच्याशी सह साधन असतें तत्स्थच अपरोक्ष होतें. जसा ग्रामाच्या गंतृशीच संबंध होतो.

॥ विवरण ॥

तात- 'कर्मकारकही' या प्रमात्याच्या चैतन्याच्या अभिव्यक्तीनें ते विषयस्थ चैतन्य अभिव्यक्त झालें. दुसऱ्या प्रमात्याच्या चैतन्याच्या अभेदानें नव्हे. म्हणून सर्वांना त्याचें [२ विषयाचें] अवभास्यत्व नाही असा अर्थ.

७१।२०

पण स्वयंप्रकाशमानाला प्रदीपादिकाप्रमाणें स्वसंसर्गी अशेषवस्तु प्रकाशित्व प्राप्त असतां अहंकारोपाधि नियम कसा म्हटला जातो. अंतःकरण परिणामानें संसृष्ट विषयाहून अन्यत्र चैतन्य उपरागाला प्राप्त असतांही त्याला प्रकाशित नाहीं हें युक्त नाहीं. कारण प्रकाशसंसर्गाचें प्रकाशमानत्व सांगितलें जातें. असंगित्वानें चैतन्याचा दुसऱ्या विषयांत उपराग होत नाही? असें असेल तर अंतःकरणांतही असंगित्वानें उपराग होणार नाहीं. म्हणून त्याच्या उपा-

॥ विवरणव्याख्यान ॥

चैतन्यकाही सर्वजनसाधारणत्व असल्यामुळे अनियम आहे असा अर्थ. साधारण्य असिद्ध आहे असें सांगतात- 'यावर नाहीं असें सांगतात'. पण ज्या प्रमात्यासह प्रधानक्रियेचें साधन असतें त्यालाच कर्मकारक अपरोक्ष होतें असा नियम कसा? कारण प्रदीपस्थापकाहून इतरांनाही त्यानें उचित कार्य दिसतें? त्यावर सांगतात- 'या प्रमात्याच्या' या प्रमात्याच्या अभेदानें अभिव्यक्त विषयगत चैतन्याला त्या [२ विषयाच्या] च्या साधकत्वाचा अंगीकार असल्यामुळे न सकल प्रमात्यांच्या अभेदानें तें अभिव्यक्त नसल्यामुळे सर्वांना त्या [विषया] च्या भासाचा प्रसंग नाही असा अर्थ.

सांगितलेल्या स्वयंप्रकाशरूपता आक्षेपसमाधानपूर्वक स्पष्ट करण्याकरितां आक्षेपाला अवतीर्ण करितात- 'पण स्वयंप्रकाशमानाला' असंगत नित्यप्रकाश आत्म्याला स्वकार्य प्रकाशन सामर्थ्य असतांही त्याचें प्रकाशन उपजत होत नसल्यामुळे उपाधीचा स्वीकार करणें योग्य असें असून उपाधीचा कोठें उपयोग आहे? हें विवक्षित आहे. कार्य विषयाच्या प्रकाशनांत? किंवा त्याच्या संबंधांत? पहिल्या पक्षाचा प्रतिक्षेप करितो- 'अंतःकरण' इत्यादीचा अनुवाद करितात- 'असंगित्वानें' विषयाच्या संबंधाप्रमाणें उपाधीच्या संबंधीही असंभवित आहे असें सांगतात 'अंतःकरणांतही'

८. विवरण ।

धीनेही किंचितही प्रकाशणार नाही हें असो पण अंतःकरणावच्छिन्न जीव प्रतिबिंब स्थानीय परिच्छिन्न आहे म्हणून त्याने संसृष्टच विषयाला प्रकाशित करावें. ब्रह्म तर बिंबस्थानीय सर्वगतत्वामुळे सर्वांचा भासक होईल. ब्रह्मातील सर्वदर्शित्व तर पुरुषातील सुखदुःख प्रमाणे जीवा प्रत जाणार नाही. व जीवातील किंचिज्ज्ञत्व पुरुषातील श्यामत्वादिकाप्रमाणे ब्रह्मांप्रत जात नाही. असें सर्व उपपन्न आहे? यांत सार नाही. विषयावच्छिन्न चैतन्याचा ब्रह्मचैतन्यतेने अहंकारावच्छिन्न जीवाच्या संबंधाच्या अभाव असल्यामुळे सर्वज्ञाप्रमाणे विषयाच्या अवभासही जीवाला होणार नाही. पण जीवोपाधि अंतःकरणाच्या व विषयाच्या परस्पर अन्वय होत असल्यामुळे उभयावच्छिन्नही चैतन्य अन्योन्यसंसृष्ट होतें. म्हणून जीवाला विषयावभास युक्त आहे. हें युक्त नाही कारण तसें असतां सर्वगत ब्रह्माशी नित्यसंसृष्ट अंतःकरण आहे म्हणून.

८. विवरणव्याख्यान ।

त्या अविच्छिन्नामुळे

किंवा त्याचा संबंध असतां विषयास संबंधही होईल असें सांगतात - 'अंतःकरणांतही' उपाधीचें ~~[illegible]~~ आत्म्याशी संसृष्ट सकलांचे भासकत्व संप्राप्त केलेले श्रवण करून ते सहन न करणारे सिद्धान्ती बोलतात - 'हें असो पण' काय जीवाला सकलभासकत्व प्रसक्त करीत नसो किंवा ब्रह्माला? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात - 'पण अंतःकरणावच्छिन्न' 'अवच्छिन्न व प्रतिबिंबस्थानीय' असे मत इच्छाला अनुसरून म्हटले असें जाणावे. दुसऱ्या पक्षी इष्टापत्ति आहे असें सांगतात - 'ब्रह्म तर' प्रत्यक् ब्रह्मातील सार्वज्ञ्य जीवांत येईल व जीवातील अल्पत्व ब्रह्मांत येईल? अशी आशंका असतां उपाधि भेदामुळे व्यवस्था आहे असें सांगतात - 'ब्रह्मातील'. आता पूर्वपक्षी - परिच्छिन्नत्वामुळे जीवाला एककाळी सकलांच्या असंसर्गाप्रमाणे कोटींच्या संसर्गाचाही असंभव असल्यामुळे कधीच ही भान होणार नाही? असें सांगतो - 'यांत सार नाही' परिच्छिन्नही जीवाला इतरसरा विषयचैतन्याच्या संबंधामुळे त्याचे भासकत्व प्राप्त आहे? अशी (सिद्धान्ती) शंका घेतात - 'पण जीवोपाधि' 'परस्पर अन्वय होत असल्यामुळे' येथें 'तरीही असा' असा अनुषंग. अतिप्रसंगाने उत्तर सांगतो - 'हें युक्त नाही' एका उपाधीच्या संसर्गामुळे जीव व विषयचैतन्याच्या अभेदाने अभिव्यक्ति मानली असतां सर्वज्ञत्वादि लक्षण ब्रह्म व जीवाची एका अंतःकरणाच्या संसर्गामुळे अभेदानें अभिव्यक्ति होईल म्हणून सार्वज्ञ्यत्वादि कधी जीवाला प्रतीत होईल असा अर्थ. दृश्यावच्छिन्न जीव ग्रहण केला जात नाही परंतु अ-

॥ विवरण ॥

त्या उपाधींत जीव ब्रह्म चैतन्याच्या अभेदाच्या अभिव्यक्तीमुळे ब्रह्माचे सार्वज्ञ्य जीवाला नित्य प्रमाणें प्रकाशित होईल. आता हें ~~असें~~ मत असेल की - सर्वगतही (जीव) चैतन्य अविद्येनी आवृतत्वामुळे स्वतःही तर प्रकाशत नाही. व स्वतः अप्रकाशमान चैतन्य प्रकाश प्रदीपाप्रमाणे प्रकाश्याला भासविण्यास समर्थ होत नाही. अंगुष्ठमात्राने आदित्याप्रमाणे परिच्छिन्नही अज्ञानाने सर्वगतही चैतन्य तिरोधानाला प्राप्त होते. तेथें अंतःकरणाच्या उपरागानें आवरणाच्या अभिभवामुळे तत्स्थ अभिव्यक्त चैतन्य किंचित प्रकाशित करितें - असें तेंही युक्त नाही कारण कार्यभूत.

८. विवरणव्याख्यान ।

विद्यावच्छिन्न व सर्वगत व म्हणून श्रुतिद्वारा विषयाच्या संसर्गामुळे त्याचे भान घडेल. असें [सिद्धान्तमत] सांगतो - 'आतां असे मत' ~~काय~~ सर्व संसर्गीत्वामुळे सर्वांला जीव पाहील? अशी आशंका असतां सांगतात - 'सर्वगतही' 'स्वतःही' यांचा अर्थ असा - चैतन्य स्वरूपानेही प्रसिद्धीला प्राप्त होत नाही. दुसऱ्याला प्रकाशीत नाही हें काय सांगावे? अप्रकाशमानत्व असतांही नयनाप्रमाणे ते भासक आहे? अशी आशंका असतां अन्यवधानानें प्रकाशकत्वामुळे तसें नाही असें सांगतात - 'स्वतः अप्रकाशमान' काय अविद्या सर्वगत आहे? किंवा परिच्छिन्न? प्रमाणाभावामुळे पहिला पक्ष नाही. दुसराही नाही. कारण परिच्छिन्नाला सर्वगत चैतन्याच्या तिरोधायकत्वाचा असंभव आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'अंगुष्ठमात्राने परिच्छिन्नही' येथील ही शब्द अज्ञानाच्या अपरिच्छेद सूचित करितात. कारण "मायां तु प्रकृतिं विद्यात्" [श्वे. ४।१०] इत्यादि वचनावरून त्रिजे सकलभूत भौतिकाच्या उपादानतेने सर्वगतत्व प्रतीत होते. असा अर्थ. मग अविद्येने आवृतत्वामुळे किंचितही जाणणार नाही? किंवा जाणत असतां सर्वांनाही जाणेल? अशी आशंका असतां सांगतात - 'तेथें अंतःकरणाच्या' अदृष्ट इंद्रियादिकांनीं सहकृत अंतःकरण ज्याच्या आकाराने परिणामाला प्राप्त होते. व त्याच्या संसर्गामुळे ज्या विषयावच्छिन्नचिद्गत आवरणाचा अभिभव होतो. त्याचा प्रकाश होतो अन्याचा नाही असा अर्थ. यावर पूर्वपक्षी - कार्याला कारणाचे अभिभावकत्व दिसत असल्यामुळे अंतःकरणाला अज्ञानाचे अभिभावकत्व अयुक्त आहे असें सांगतो - 'तेंही युक्त नाही'

अंतःकरणावच्छिन्नत्व किंवा अविद्यावच्छिन्नत्व असतां प्रमातृत्वादि व्यवस्था घटते असें सांगतात —

॥ विवरण ॥

अंतःकरणानें स्वतःचें उपादान अशा अज्ञानाच्या अभिभवाचा अवांतर अवकाश आहे. म्हणून किंचित् ज्ञातत्व विषयीं अहंकारोपाधीचें वर्णन युक्त नाहीं. [सिद्धान्ती] यावर सांगतो— हा उपाधि युक्तच आहे. कारण सर्वगत ही जीवाच्या असंगितेनें सर्वांशीं असंयोग आहे व प्रकाशाचा संयुक्त वस्तूंचें अवभासत्व आहे. म्हणून सर्वोपादानत्वानें स्वतः उपाधि सर्वगताचा स्वतः प्रमाण भासावें. अनुपादानत्वामुळे जीवत्व नाहीं. पण सर्व वस्तु व देशाशीं अव्यवहितत्वानें सर्वगताचा, विषयान्तरांत असंगितेनें अवस्थान असलेल्या अंतःकरणाशीं तरी संसर्गिता कशी संभवेल? सांगतो— जसें गोत्वादिक

८३१२०

जातिविशेष आकाशादिमान व्यक्त्यंतर प्रदेशाशीं संनिहित असतांही स्वभावविशेषामुळे अश्वादि व्यक्तींच्या असंगितेनें त्यांची अनभिव्यक्त असेही सास्नादिमान पिंडांच्या संगितेनें अभिव्यक्त होतात— किंवा जसें वायुवाकाशांत गंधादि प्रदेशांत व्यापक ही प्रदीपप्रभा स्वभावविशेषामुळे त्यांना प्रकाशित न करितां रूपसंसर्गितेनें त्यालाच प्रकाशित करिते.

॥ विवरणव्याख्या ॥

'यावर सांगतो' त्यांत प्रथम अविद्यावच्छिन्न त्याला ग्रहण करून त्याचेंच उपपादन करितात— 'हा उपाधि' त्या संयोगाचा अभाव असतांही प्रकाशत्व कां असणार नाहीं? अशी आशंका असतां सांगतात— 'व प्रकाशाचा' पण असंगित्व असतांही ब्रह्माला जसें सकलवस्तुभासकत्व आहे. त्याप्रमाणें जीवाचाही राहील? अशी आशंका असतां वैषम्यानें उत्तर सांगतात— 'म्हणून' ब्रह्माच्या अभेदामुळे जीवाचाही तथात्व राहील? अशी आशंका असतां सांगतात— 'अनुपादानत्वामुळे' चिन्मात्राचा ब्रह्माशीं अभेद असतांही परिच्छिन्न ज्ञानशक्ति जीवाचें उपादानत्व नाहीं. त्यामुळे सकलावभासकत्वाची अनुपपत्ति आहे. असा अर्थ. म्हणून असंगितेनें स्वतः विषयाशीं संबंधाचा अभाव असल्यामुळे त्याच्या सिद्धीकरितां उपाधि आश्रयणीय आहे. असें सांगितलें. त्या उपाधीच्या संसर्गाप्रमाणें विषयाचा संसर्गही असेल अन्यथा उपाधीच्या संसर्गाचीही अनुपपत्ति आहे? अशी शंका घेतो— 'पण सर्व वस्तु' सर्वगतत्व असतांही कोणाच्या कोणाशीं संसर्ग होतो व कोणाशीं होत नाहीं हे दोन्हीही प्रकार दिसत असल्यामुळे विरोध नाहीं असें सांगतात— 'सांगतो' सर्वगत जाति आहे या मताचा आश्रय करून दृष्टान्त सांगतात— 'जसें गोत्वादिक' व्यक्ति सर्वगत असून जाति नाहीं या पक्षांत दृष्टान्त सांगतात— 'जसें वायुवाकाशांत गंधादि' स्वरूपानें असंभवाचाही उपाधिसंबंधामुळे संभव

॥ विवरण ॥

याप्रमाणें चैतन्यही स्वभावविशेषामुळे अंतःकरणांत संसर्गाला प्राप्त होतें अन्यत्र नाहीं हें युक्त आहे. व जसें केवळ अग्नीनें न दाह्यही तृणादि लोहपिंड समारूढ अशा त्यानें दहन केले जातात. तसें अहंकारांत समारूढ आत्म्याकडून केवलानें अप्रकाश्यही विषय प्रकाशित केले जातात. म्हणून अहंकारोपाधिवर्णन युक्त आहे. अथवा सोपाधिकत्वामुळे जीव परिच्छिन्न असल्यामुळे सर्वांचा भासक होत नाहीं. व जीवाच्या अवच्छेदाला निमित्त अशा अंतःकरणाच्या परिणामाच्या संसर्गानें केलेल्या अभिव्यक्तीमुळे विषयावच्छिन्न चैतन्याला जीवचैतन्यता विरुद्ध येत नाहीं. तसें ब्रह्माकारपरिणत अंतःकरणाच्या संसर्गाच्या अभावामुळे नित्य प्रमाणें ब्रह्माच्या प्रकाशाचा प्रसंग येत नाहीं. अंतःकरणाच्या स्वरूपमात्राशीं संसर्गाची तर

८३१७

अंतःकरणा

अभिव्यक्ति अंगीकृत नाहीं. कारण मग त्याच्या (~~जीवा~~) ठिकाणीं धर्मादिकांच्याही अभिव्यक्तीचा प्रसंग येतो. जीवाकार अहंवृत्ति परिणत अंतःकरणानंतर जीव अभिव्यक्त होतो. अन्यथा सुषुप्तींत होणार नाहीं. म्हणून परिच्छिन्न त्यामुळे जीवाला सर्व विषयाची

॥ विवरणव्याख्यान ॥

तर दृष्टान्त सांगतात— 'व जसें' सर्वगत जीव आहे असें ग्रहण करून प्रतिकर्मव्यवस्था स्थापित केली. सांप्रत त्याला परिच्छिन्नत्व असतांही व्यवस्था घडविणें शक्य आहे असें सांगतात— 'अथवा सोपाधिकत्वामुळे' अंतःकरणोपाधिकत्वामुळे असा अर्थ. अहंकारावच्छिन्न चैतन्याला विषयचैतन्याशीं असंबंधामुळे विषयाच्या भानाचा असंभव आहे. असें जें सांगितलें त्याला दूषित करितात— 'व जीवाच्या' विषय व प्रमातृचैतन्याचें एका अंतःकरणपरिणामाच्या संबंधामुळे अभेदानें स्फुरण होतें. त्यामुळे विषयाचें प्रकाशन उपपन्न होतें. असा अर्थ. आतां प्रत्यक् व ब्रह्माचाही एका अंतःकरणसंबंधामुळे ब्रह्मानेंही प्रत्यक्शीं अभेदानें स्फुरण होईल? असें तें त्यावर सांगितलें पाहिजे कीं— काय ब्रह्माकारपरिणत अंतःकरणाच्या संसर्गामुळे त्यानें स्फुरण होईल? किंवा अंतःकरणमात्राच्या संसर्गामुळे? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात— 'तसें ब्रह्माकार परिणत' दुसऱ्याला दूषित करितात— 'अंतःकरणाच्या स्वरूप' अंतःकरणमात्राच्या संसर्गामुळे प्रत्यगात्म्याच्या अभिव्यक्तीप्रमाणें ब्रह्माचीही अभिव्यक्ति कां होणार नाहीं? अशी आशंका असतां दृष्टान्ताच्या असंमतीनें उत्तर सांगतात— 'जीवाकार' त्याविषयीं निर्णय करून सांगतात— 'अन्यथा' कारण तेथें जीवाकार अहंवृत्तीचा अभाव असतां जीवाचें अनादि सतत असलेल्या बुद्ध्यवच्छिन्न जीव यादृशांत प्रमातृत्वव्यवस्था उपपन्न होते असा उपसंहार करितात—

'म्हणून'

२५११

॥ व्याख्यान ॥

पण नीलादि विषयही जर अपरोक्षस्वभाव आहे, तर नीलात्मक संवित आहे असें सांगितलें.

॥ विवरण ॥

अवभासिता नाही. अथवा अज्ञानाने आवृत स्वतः अप्रकाशमान तेजें विविध विषयाला न भासविणार।, अंतःकरणाच्या उपरागामुळे आवरणाचें तिरोधान झालें असतां तेथेंच अभिव्यक्त झालेला त्यानें संसृष्ट विषयाला भासविलें. वृश्चिक वृक्षादि कार्याला गोमय मृदादि कारणाच्या स्वभावाचें तिरोधायकत्व दृष्टच आहे. अज्ञावीतीनें आत्म्यांत प्रमातृत्वादि अवस्था सिद्ध झाली

विषयाला चैतन्यविवर्तत्व असल्यामुळे त्याच्याहून श्री अभिन्नही चैतन्य अहं अवभासाशीं रूप सांगितलें त्यावर अपसिद्धान्तप्रसंगाची शंका घेतात 'पण नीलादि' ६३१९२ यत्किंचित साम्यावरून अपसिद्धान्त असतां तर सर्व च सिद्धान्तांचा

॥ विवरणव्याख्यान ॥

जीवाला सर्वगतत्व असतां विषयाशीं उपरागाकरितां उपाधि इष्ट आहे असें सांगितलें. संप्रत उपकरणाच्या अभिप्रायाकरितां तो आहे अशा मतान्तराचा उपन्यास करितात- 'अथवा' विषयाकारानें परिणत अंतःकरण अंतःकरणशब्दाचा अर्थ आहे. विषयाचें निगूहन आवरण आवरणशब्दाचा अर्थ आहे. कार्याला कारणाचें अभिभावकत्व नाहीं असें जें सांगितलें त्यावर सांगतात- 'वृश्चिक' यासं लीव अगेत आदिशब्दाचा अर्थ. प्रतिकर्मव्यवस्थेचा उपसंहार करितात- 'अज्ञावीतीनें' जीवाला सर्वगतत्व असतां विषयाशीं उपरागाभावानें व आवरणाच्या तिरोधायकत्वानें उपाधीचा उपयोग आहे व परिच्छिन्नत्व असतां विषयाशीं संसर्गाकरितां आहे. अशी उपाधींच्या अपेक्षेनें व्यवस्था युक्त आहे असा अर्थ. 'च' शब्दानें अद्वैतमताची निर्दोषता सांगितली जाते.

पण विषयांत अभिव्यक्त झालेल्या चैतन्यानें त्याची प्रतीति सांगितली असल्यामुळे विषय व संवित् यांचा अभेद सांगितला नसल्यामुळे अपसिद्धान्त असल्याची शंका 'पण नीलादि' या ग्रंथानें कशी घेतली जाते? अशी आशंका असतां तीहि सांगतात- 'विषयाला चैतन्यविवर्तत्व' विषयाच्या चैतन्यविवर्तत्वानें त्याच्याशीं अभेद असतांही आत्मा अन्य मानला असल्यामुळे अपसिद्धान्त नाहीं? अशी आशंका असतां सांगतात 'अहमवभासाशीं' अहं अवभास ज्याचा आहे असा आत्मा त्याच्याशीं अभिन्न सांगितला असा अर्थ. प्रमातृ व विषय यां-

॥ व्याख्यान ॥

असे होते म्हणून तोच महायानिक पक्ष समर्थित होतो? असें नाही कारण परस्पराहून भिन्न नील व पीत भासतात. अपरोक्षता तर तशी नाही. कारण तिच्यांत विच्छेदावभास असला तरी तिचें ऐक्य.

॥ विवरण ॥

अंकुरादिक. येथें तर महान सिद्धान्तभेद आहे. क्षणिक विज्ञानाहून भेदानें अर्थक्रियासामर्थ्य सत्त्वशून्य विषय आहे असे विज्ञानवादी म्हणतात. तत्त्वदर्शी तर अद्वितीय संवेदनाहून अभेद असतांही विषयाचें भेदानेंही अर्थक्रियासामर्थ्य सत्त्व व स्थायित्व अबाधित आहे असें म्हणतात. तेथें सिद्धान्तांचें ऐक्य कसें? असें सांगण्याकरितां संवेदनांचें ऐक्यपद दाखवितात- 'असें नाही' ६३१९८ पण प्रत्यभिज्ञानावरून एकरूपता असो? घटसंवित् पटसंवित् असा भेद होत असतो? त्यावर सांगतात- 'तिच्यांत विच्छेदावभास' स्वरूपविषयक प्रत्यभिज्ञा परोपाधीनें भासणाऱ्या विच्छेदानें बाधित होत नाहीं असा भाव.

॥ विवरणव्याख्यान ॥

तत्त्वाची अभेदानें अभिव्यक्ति उपपादन केली असल्यामुळे शंकेला अवसर आहे ना असें जर. अनुवृत्त व व्यावृत्त भावानें विषय व संवित् यांचा भेद असतांही विषयाच्या चिद्रूपतेचा अभेद मानला असल्यामुळे अपसिद्धान्त दुर्वार आहे. 'म्हणून असें नाहीं' इत्यादि ग्रंथ कसा? अशी आशंका असतां काय यत्किंचित साम्यानें अपसिद्धान्त म्हणतात? किंवा सर्व साम्यानें? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'यत्किंचित' सर्वसाम्य तर असिद्ध आहे असें सांगतात 'येथें तर' सिद्धान्तभेद सांगतात- 'क्षणिक' पण बाधित स्थायित्व तुमच्या मतांत कोठें आहे? स्था- विज्ञेय.

(संवेदनाहून)

वर सांगतात- 'अबाधित' विषयांना संवेदनप्रतियोगिक प्रामाणिक भेदाचा अभाव असतांही आरोपित भेद मानला असल्यामुळे महायानिक मतप्रसंग नाहीं, असा अर्थ. गाय गाय असा एकरूपता आ असतांही गईत भेद तुमच्याकडून आश्रयिला जातो. त्या प्रमाणे येथेंही संवित्पक्षें आहे? असें शंका घेतात 'पण प्रत्यभिज्ञानावरून' खंड मुंडादि भेद प्रत्यक्षसिद्ध असल्यामुळे गाय गाय अशा अनुवृत्त प्रत्ययाला जसें सामान्यविषयत्व आहे. तसें संवित् संवित् अशा अनुवृत्त प्रत्ययाला सामान्यविषयत्व आहे व भेदप्रत्ययाला व्यक्तिविषयत्व आहे. म्हणून संविदांमध्यें ऐक्य नाहीं. असा अर्थ. पण भेदावभास असतांही अपरोक्षतेचें ऐक्य होत नाहीं असें करून सांगतात भेदावभासाला व्यक्तिभेदविषयत्व असून प्रत्यभिज्ञानाला सामान्यविषयत्व नाहीं त्यावर सांगतात 'स्वरूपविषयक' इत्यन्तांत व्यक्तिभेदाला प्रामाणिकत्व असल्यामुळे

व्याख्यान

रूपकळेत. म्हणून ती त्यांच्या स्वभावाची नाही. जर असेल तर त्यांच्या प्रमाणेच तिच्यांतही भिन्न-स्वभावताही असेल. परंतु तशी भासत नाही. पुनः (~~वैभाषिक व सौत्रान्तिक~~) बौद्धांकडूनही

॥ विवरण ॥

पण संविदांमध्ये एकत्व असतांही विषयाशी तिचा अभेद कां असणार नाही? त्यावर सांगतात- 'जर असेल तर' अनुवृत्तांचा व्यावृत्तांशी अभेद नसतो. अनुवृत्तत्व असल्यामुळें आकाशघटादिकांप्रमाणें. असें अनुमान सांगितलें. मात्र प्रत्यक्षही विषय व संवित् यांमध्ये भेद आहे असें सांगतात- 'पुन्हा बौद्धांकडूनही' नीलात्मक संवित् म्हणजे नीलविषयक सांगितला जातो. कारण बौद्धांकडून एक आणि

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रत्यभिज्ञेचा सामान्यविषयत्व घटतें: प्रकृतांत तर संवित् भेदाचा अप्रामाणिकत्व असल्यामुळें प्रत्यभिज्ञेचा स्वरूपविषयत्व आहे. असा अर्थ. पण 'नीलसंवित् पीतसंवित्' असा भेद प्रतीत होतो? त्यावर सांगतात- 'परोपाधीनें' उपाधी नील भेदावांचून न भासणाऱ्या भेदत्वामुळें संवित् यांमध्यें स्वतः भेद नाही. परंतु गगनातील भेदाप्रमाणें औपाधिक आहे. म्हणून भेद प्रत्यक्षाचा उपाधीने बाध्यकत्व नाही असा अर्थ. पण वस्त्र अनुवृत्त आहे व विषय व्यावृत्त असून त्याचाही वस्त्राहून अभिन्न आहेत असें प्रत्यक्षाकडून ग्रहण केलें जातें. त्याप्रमाणें संवित् व संवेद्य विषयांत अभेद कां असणार नाही? अशी शंका घेता 'पण संविदांमध्यें' वस्तु व विषयांतही वास्तविक ऐक्य अंगीकार केलें जात नाही. उलट वास्तविक ऐक्य इष्ट आहे असें वैषम्य आहे. असें अभिसंधान करून सांगतात- 'त्यावर सांगतात' एका प्रमाणाने साधलें तर अर्थात दुसऱ्या प्रमाणाच्या उपन्यासाकरिता 'पुनः बौद्धांकडूनही' अशी उक्ति युक्त आहे. परंतु पूर्वी प्रमाणाचा उपन्यास दिसत नाही? अशी आशंका असतां सांगतात- 'अनुवृत्ताचा' संवित् व संवेद्यां-चा अनुवृत्त व्यावृत्तता व अभेद दर्शविलेला नाही आहे. त्याविषयीं दृष्टान्त सांगतात- 'आकाशघटादिकांप्रमाणें' 'अनुवृत्त तत्वतः व्यावृत्ताहून अभेदवत् नसते अनुवृत्तत्वामुळें आकाशाप्रमाणें? जातींत व्यभिचारही नाही कारण तिचा पक्षतुल्यता आहे. असा अर्थ. 'पण नीलात्मक संवित्' येथें नील व संवित् यांचा अभेद सांगितला व तसें असतां नीलसंवित् व सहप्रकाशाचें भेदसाधन असंगत आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'नीलात्मक संवित्' त्याविषयीं हेतु सांगतात- 'कारण बौद्धांकडून' मग पण संवित् शब्दानें

व्याख्यान

नीलात्मक संवित् हून अन्यत्र बाहेरहून भिन्न अपरोक्ष प्रत्यगवभास स्वरूपमात्रांत पर्यवसित विकल्प ग्रहण केला जातो. नील संवित् (नीलविषय) प्रत्यक्ष हून व्यावृत्त इदंतेने (=हेत्वाने) ग्राह्य-

॥ विवरण ॥

विषय व विषयी अशा दोन संवित् मानल्या जात नाहीत. 'प्रत्यगवभास' याने अहं संवेदन मात्र सांगितलें जातें. पण अहं-कारांच्या चैतन्याहून व्यतिरेक असतांहीं चैतन्याच्या 'अहं' अशा भानाप्रमाणें नील व अहंबुद्धीचें ऐक्य आहे? अशी आशंका असतां 'बाहेरहून भिन्न' असें म्हटलें. नित्यानुमेयत्वाच्या व्यावृत्तीकरितां 'अपरोक्ष' असें म्हटलें. अन्यत्वाचा हेतु सांगतात- 'स्वरूपमात्रांत' अन्यत्वाचा केवळ मानलेलें नाही तर त्याचा अनुभवही आहे असें सांगतात-

'नीलसंवित्'

॥ विवरणव्याख्यान ॥

नील स्वरूपाची विवक्षा असतां नीलाहून अन्य असेंच म्हणावयास हवें होतें. संवित् ग्रहणाकरिता ही असें ही म्हणतां येणार नाही. कारण संवित्हून पृथक् नीलाच्या अभावा असतां त्याच्यासें जिल्याची अनुपपत्ति असल्यामुळें नीलाची सत्ता इष्ट आहे. असें अभिमत असल्या-करितां संवित्चें ग्रहण आहे असा अर्थ. 'प्रत्यगवभास' येथें प्रतीच्या (प्रत्यगात्म्याचा) अवभास अशा विग्रहाची शंका देऊं के? परंतु ते उपपन्न होत नाही कारण अवभासाहून व्यतिरिक्त प्रतीच्या त्यांनी दान केलें नाही. म्हणून ~~[illegible]~~ सांगतात- 'प्रत्यगवभास याने'? 'नीलघटाला' हें ज्ञान अपरोक्ष आहे असें प्रसिद्ध आहे. त्याने संवित्चें ग्राह्यत्व असतां विषय व विषयी संविदांना तुल्यत्व सिद्ध. परंतु ते युक्त होत नाही. म्हणून ज्या नीलाशी संवित्चा अभेद सांगितला त्या नीलाहून अहं बुद्धीचें अन्यत्व बौद्धांकडून अंगीकार केलें जातें. व त्यांचा ग्राह्य ग्राहकता अनुभवसिद्ध आहे. म्हणून त्यांच्या भेदाचा प्रत्यक्ष आहे. पण आलय विज्ञान व प्रवृत्ति विज्ञानांचा भेद त्यांच्याकडून अंगीकृत आहे म्हणून त्याचे साधन सिद्धसाधन आहे व प्रस्तुत अ-ननुरूपही आहे? अशा प्रकारेंही होऊं नये. कारण त्यांच्याकडून आलयाचें मान केलें. आलयविज्ञानाचें व प्रवृत्तिसंवित्-चे अनुसरून शंका भिन्नता वाद्यांकडून ऐक्य अंगीकृत आहे (सिद्धान्तमताचा ~~[illegible]~~ - 'कारण बौद्धांकडून' उत्तर सांगतात 'बाहेरून भिन्नत्वास' प्रकाश्य व प्रकाशक असा चैतन्यवत् अहंत्व व नीलत्वाचें ऐक्य मानलें नसून तें येथें घ्यावयाचें असल्यामुळें या गमनाही असा अर्थ.)

॥ व्याख्यान ॥

रूप प्रतीत होतें हीं; व त्यामुळे ग्राह्यग्राहकरूप दोन वस्तु इतरेतरांहून भिन्न सिद्ध होतात. असें नाही. कारण दोन्हीही स्वरूपमात्रनिष्ठ असतां त्यांच्यांत विषयविषयीभाव कसा? मग 'मी

॥ विवरण ॥

'मी नील पहातों' असा विषय व अहं संवेदनांत कांहीं क्रमें तीन भेद प्रत्यक्ष आहे असा अर्थ. फक्त संगतात्- 'व त्यामुळे' यावर विज्ञानवादी शंका घेतो 'असें नाही' इ. भाव— संवित् हून अन्य जर नील आहे तर तें संवेदनांत भासणार नाही. जर भासेल तर सर्व कां भासत नाही? कारण विशेष संबंधाचा अभाव आहे. नीलाकार संवित् मीं जनकता विशेष संबंध आहे? असें असेल तर नाही. कारण इंद्रियादिकांहीं विषयता प्रसंग येतो. म्हणून स्वाभाविक असाधारण

स्वरूपमात्रनिष्ठ = परस्पर असंसृष्टस्वरूप.

अभेद संबंधामुळेच विज्ञानांत नील भासते— असा सिद्धान्ती. तर भेदावभास हा प्रत्यक्ष असतां तो कोण कसा निषेध

॥ विवरणव्याख्यान ॥

